**महाराष्ट्र शासन**

दुरध्वनी क्रं. - 02462-244474, 234504
फॅक्स क्रं. - 02462-235103

नियंत्रण कक्ष क्रं. - 02462-234720
E-mail Id- sp.nanded@mahapolice.gov.in, pronanded@gmail.com

---

जा.क्रं./ प्रेस नोट / 350 / पोलीस अधीक्षक कार्यालय, नांदेड / 2024 / दिनांक : 29 / 09 / 2024

---

## 1)खुन :—

**तामसा :—** दिनांक 26.09.2024 रोजी 19.45 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपुरी नांदेड येथे**, यातील फिर्यादी हे त्यांचे घराच्या गल्लीत मित्रासोबत बोलत असताना फिर्यादीचे घरात आईचा जोरात ओरडण्याच्या आवाज आल्याने घरात जावुन पाहिले असता घरात आई बेशुध्द अवस्थेत पडलेली दिसली यातील नमुद आरोपीने दारू पिण्यासाठी पैसे न दिल्याचे कारणा वरून तीचे डोक्यास लोखंडी कुऱ्हाडीने मारून डाव्या बाजुस गंभीर दुखापत करून रक्तस्त्राव होवुन उपचारा दरम्यान मरण पावली यातील फिर्यादीचे आई **मयत नामे लक्ष्मीबाई परसराम झळके, वय 42 वर्षे, रा. रा. गवतवाडी ता. हदगाव जि. नांदेड** हिस तिच्या पतीने डोक्यात लोखंडी कुऱ्हाडीने वार करून खुन केला. वगैरे **फिर्यादी ज्ञानेश्वर परसराम झळके, वय 24 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. गवतवाडी ता.हदगाव जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 113 / 2024 कलम 103 (1) भारतीय न्याय संहिता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री नरवटे, मो.क्रं. 8149863325** हे करीत आहेत.

## 2)खुनाचा प्रयत्न :—

**भाग्यनगर :—** दिनांक 28.09.2024 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **तरोडा नाक्याजवळील विश्रांती बार समोरील रोडवर नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगनमत करून यातील फिर्यादीस रोडवर का उभा आहेस असे म्हणुन हातातील चाकुने फिर्यादीचे पोटावर, दंडावर मारून शिवीगाळ करून तुला खतम करतो असे म्हणुन मारहाण करून गंभीर दुखापत करून खुन करण्याचा प्रयत्न केला. वगैरे **फिर्यादी शिवराज जगन्नाथ बागेलीकर, वय 39 वर्षे, व्यवसाय ॲटो चालक रा. कारखाना रोड पाण्याचे टाकीजवळ, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पोस्टे भाग्यनगर** गुरनं 481 / 2024 कलम 109,(1) 296, 351(3),352,3(5) भारतीय न्याय संहिता— 2023 कायदा सह 4 / 25 भा.ह.का.प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि / श्री वाडेवाले, मो.क्रं. 9975745357** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :—

**कुंटुर :—** दिनांक 27.09.2024 रोजी 11.30 वा.ते 12.00 वा.चे दरम्यान, **मौ. कुंटुर तांडा ता. नायगाव जि.नांदेड** येथे यातील नमुद तीन आरोपीतांनी फिर्यादी यांचे घराचे कुलुप दगडाने तोडुन घरात प्रवेश करून घरातील सुटकेश मधील नगदी 4,000 / — रु व एक सोन्याची अंगठी किंमती 18,000 / —रू असा एकुण 22,000 / —रू मुद्येमाल चोरून नेला. वगैरे **फिर्यादी गोमलुबाई भिकु जाधव, वय 70 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. कुंटुर तांडा ता.नायगाव जि.नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटुर** गुरनं 205 / 2024 कलम 305, 331(1) भारतीय न्याय संहीता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / श्री कंधारे, मो. नं. 8856080025** हे करीत आहेत.

## 4)जनावर चोरी :—

**नायगाव :—** दिनांक 27.09.2024 रोजी 20.00 वा.ते दिनांक 28.09.2024 रोजी 06.00 वा.चे दरम्यान **मौजे लालवंडी शिवार ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे आखाडयावर बांधलेले एक बैल व एक गाय किंमती 70,000 / — रूपयांचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी महेश शंकरराव चौधरी, वय 30 वर्षे, व्यवसाय शेती रा. लालवंडी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरनं 249 / 2024 303(2) भारतीय न्याय संहीता—2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ / 349, सांगवीकर, मो.क्रं. 7875643333** हे करीत आहेत.

## 5)आत्महत्येस प्रवृत्त केले :–

**देगलुर** :– दिनांक 25.09.2024 रोजी 09.00 वा. चे पुर्वी, **मौ. तमलुर ता. देगलुर जि. नांदेड येथे**, यातील फिर्यादीची मुलगी **मयत नामे निकीता अरूण उर्फ रणजित गोपाळराव खांडेकर,वय 22 वर्षे**, **रा. तमलुर ता. देगलुर जि. नांदेड** हिस यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून मयतास घर बांधण्यासाठी माहेरहुन तीन लाख रूपये घेवुन ये असे म्हणुन शारिरीक व माणसीक छळ करून क्रुर वागणुक दिल्याने आरोपीतांचे त्रासाला कंटाळुन गळफास घेवुन आत्महत्या केली. यातील नमुद आरोपीतांनी तिला आत्महत्येस प्रवृत्त केले. वगैरे **फिर्यादी शिवकांता बालाजी बंडगर, वय 40 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. शेवाळा (नवीन) ता. देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलुर** गुरन 460/2024 कलम 108, 80,85, 3(5) भा.न्या. सं.–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री फड, मो.नं. 9130087444** हे करीत आहेत.

## 6) कोपटा ॲक्ट :–

**नांदेड ग्रामीण** :– दिनांक 28.09.2024 रोजी 19.55 वा. चे सुमारास, **सहयोग पान शॉप विष्णुपुरी, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या शरिरास अपायकारक असलेला व स्वतःचे आर्थीक फायदयासाठी विवीध कंपणीचा गुटखा, सुगंधी जर्दा व सिगारेट किंमती 3850/–रूपयाचा माल चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोकॉ/1488, श्री आसिफ अली अजगर अली ने. पोस्टे नांदेड ग्रामीण** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 879/2024 कलम 5,7 कोपटा ॲक्ट कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2121 पांचाळ**, मो.क्रं. 9011079556 हे करीत आहेत.

## 7)भारतीय हत्यार कायदा :–

**वजिराबाद** :–दिनांक 28.09.2024 रोजी 17.45 वा. चे सुमारास, **उस्मानशाही मिल शाळेच्या पाठीमागे पंचशील नगर, नांदेड येथे**, यातील नमुद आरोपीने आपले ताब्यात बेकायदेशीररित्या खंजर किंमती 500/–रूपयाचा बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी** पोहेकॉ/**2085, श्री विजयकुमार कुरमय्या नंदे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 479/2024 कलम 4/25 भारतीय हत्यार कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1230, गव्हाणकर, मो.क्रं. 9923495694** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**शिवाजीनगर** :– दिनांक 28.09.2024 रोजी 19.10 वा. चे सुमारास, **जुने फायर स्टेशन जवळ आंबेडकर नगर,.नांदेड येथे**, यातील नमुद दोन आरोपीतांनी विना परवाना बेकायदेशिररीत्या मिलन डे नावाचा जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 4,230/–रूपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/1007, अनिल सुर्यकांत झांबरे, ने. पोस्टे शिवाजीनगर**, यांनी दिलेल्या फिर्यादवरून **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 396/2024 कलम 12(अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/81, बंडेवार, मो. नं. 9850680909** हे करीत आहेत.

## 9)पाण्यात बडुन मृत्यु :–

**तामसा** :–दिनांक 27.09.2024 रोजी 08.30 वा. सुमारास, **मौ. उमरी(ज) शिवार खदानात ता. हदगाव जि. नांदेड येथे**, यातील **मयत नामे शुभम धोंडिबा दुगाळे, वय 19 वर्षे, रा. वायफना बु.ता.हदगाव जि.नांदेड** हा त्याचे जनावरे चारवीत खदानाला जनावरांना पाणी पाजण्यासाठी नेऊन पाणी पाजवत असताना पाय घसरून पाण्यात पडुन बुडून मरण पावला. वगैरे **खबर देणार शेषेराव दत्तराव दुगाळे वय 53 वर्षे, व्यवसाय शेती रा. वायफना बु. ता. हदगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे तामसा** आ. मृ. **24/2024** कलम 194 भारतीय नागरीक संहीता–2023 कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/सुर्यवंशी, मो.नं. 9923451146** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड